I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 263-271
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपुर जिल्हयातील आदिम कोलाम जमातीकरीता "आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजना"

अंबादास भगवान तिरनकर व आशिष कृष्णाजी महातळे
जनता महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author: ambadastirankar@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 | Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश** :- आदिवासी समाज हा मागासलेला समाज असुन तो जंगलात राहणारा, वनात भटकणारा, डोंगर दऱ्यात जिवन जगणारा मानवी समाज म्हणुन आपल्या समोर उभा राहतो. आदिवासी म्हणजे आदिपासुन राहणारे या भारत भुमीवर सर्वांत प्रथम मानव नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर वास्तव्याला होता असे इतिहासकार व सिंधु संस्कृतीचे गाढे अभ्यासक श्री.पु.ग.सदार म्हणतात भारतात अनुसुचित जमातीची संख्या ७०० पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण ४५ आदिवासी जमाती वास्तव्यास असुन केंद्रशासनाने अधिसुचित केलेल्या कोलाम, कातकरी व माडीया या आदिम जमातींचा समावेश सुध्दाया ४५ जमातीमध्ये आहेत. आदिम जमाती हया इतर आदिवासी जमातीच्या तुलनेमध्ये अतिशय मागासलेल्या जमाती आहे. त्यामुळे केंद्रशासनाच्या वतीने आदिम जमातीच्या विकासाकरिता आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम ही योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. महाराष्ट्रामध्ये आदिवासी विकास विभागाअंतर्गत आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिकव त्याअंतर्गत एकुण चार अपर आयुक्त (नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर) कार्यरत आहे. तसेच एकुण ३० एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय कार्यरत असुन यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांना अतिसंवेदनशील प्रकल्पाचा दर्जा प्राप्त आहे.

चंद्रपुर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असुन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय चंद्रपुर च्या कार्यक्षेत्राअंतर्गत चंद्रपुर, बल्लारपुर, राजुरा, कोरपना, जिवती, गोंडपिपरी, सावली, पोंभुर्णा, मुल व सिंदेवाही या दहा तालुक्यांचा समावेश होतो. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय चिमुर च्या कार्यक्षेत्राअंतर्गत चिमुर, भद्रावती, वरोरा, नागभिड, ब्रम्हपुरी या पाच तालुक्यांचा समावेश होत असुन चंद्रपुर जिल्हयातील आदिवासी जनतेकरीता शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, उपजिविका, कृषी, सिंचन, या पायाभुत सुविधांचा विकासाकरिता अनेक योजना चंद्रपुर जिल्हयातील आदिवासी जनतेकरीता उपरोक्त दोन्ही कार्यालयाच्या वतीने राबविण्यात येतात.

त्यामध्येच कोलाम जमाती करीता आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम हि योजना राबविण्यात येत असुन त्याअंतर्गत कोलाम जमातीचा विकास करणे हा या योजनेचा मुळ उद्देश आहे. सदर योजनेबाबत झालेली अंमलबजावणी त्यापासुन झालेला कोलाम जमातीला लाभ तसेच या योजनेपासुन कोलाम जमातीच्या जिवनमानावर होणारा परिणाम या सर्व बाबींचा अभ्यास या शोध निंबधामध्ये करण्यात आलेला आहे.

**बीजसंज्ञा** :- कोलाम गुडा, अधिसुचित, आदिम जमाती, क्षेत्रीय विकास, सामुहिक विकास, शेतकरी उत्पादक गट, मार्गदर्शक तत्वे (Write-up).

## प्रस्तावना :

आदिवासी म्हणजे आदिकाळापासून वास्तव्यास असणारा समाज होय. सर्वसाधारणपणे जंगलात दुर्गम दऱ्याखोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात आदिवासी समाज वस्ती करून

राहतात. इतर समाजाच्या तुलनेत आदिवासींच्या चालीरिती व संस्कृती हया वेगळया आहेत. आदिवासी समाज हा निसर्गपूजक समाज असल्यामुळे जंगली वृक्ष, प्राणी, पक्षी हे आदिवासींचे आराध्य दैवत "पुजक" आहे.

इंग्रजीतील "Tribe" या शब्दाचा अर्थ "जमात" असा होतो. आदिपासून किंवा सुरूवातीपासुन दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय. डॉ. वेरियर एलविन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना "Aboriginal" असे संबोधले आहे. "Aboriginal" या शब्दाचा अर्थ मुळचे निवासी असा होतो.

**आदिवासी समाजाबाबत काही शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या:-**

**१) गिलीन यांचे मते:-**

"एका विशिष्ट भुप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या गटाच्या समुहाला आदिवासी समाज म्हणतात"

**२) आदिवासी समिती परिषद (शिलॉंग १९६२) ने केलेली व्याख्या:-**

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागास असलेला अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारीत सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात."

परंतु वरील व्याख्यांच्या अनुषंगााने निरक्षरता असण्याचा मुद्दा मात्र काहीशा प्रमाणात कमी झाला आहे.

**भारतातील आदिवासी जमाती:-**

भारतीय संविधानामध्ये आदिवासींना "अनुसुचित जमाती" असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३४२ (१) अन्वये ज्यांचा समावेश अनुसुचित जमातीच्या यादीत केला आहे त्यांना "अनुसुचित जमाती" असे म्हणतात. भारतीय संविधानानुसार आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीकोणातून त्यांना नोकरी, व्यवसाय आणि निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून खास राखीव जागा ठेवल्या जातात.आपल्या देशात जवळजवळ २५० आदिवासी जमाती आहेत. आदिवासी जमाती आणि उपजमातीचा विचार केल्यास ही संख्या ४५० ज्या जवळपास आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या १० कोटी असुन ती एकुण लोकसंख्येच्या ८.६ टक्के इतकी आहे.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असून महाराष्ट्रात सद्यास्थितीत एकुण ४५ आदिवासी जमाती वास्तव्यास आहे. राज्यात एकुण ३६ जिल्हे असुन आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे,

नंदुरबार, जळगाव, नाशीक, ठाणे, पालघर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीया, नागपूर, अमरावती आणि यवतमाळ या जिल्हयामध्ये अधिक आहे.सन २०११ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्राची एकुण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७२ हजार ९७२ असुन आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ०५ लाख १० हजार २१३ म्हणजेच महाराष्ट्राच्या एकुण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के आहेत.

चंद्रपूर जिल्हयामध्ये १५ तालुक्यांचा समावेश असुन जिल्हयाची लोकसंख्या सन २०११ च्या जणगणनेनुसार २२,०४,३०७ इतकी आहे. त्यापैकी आदिवासी समाजाची लोकसंख्या ही ३,८९,४४१ आहे म्हणजेच ती एकुण लोकसंख्येच्या १७.६७ टक्के आहे. चंद्रपूर जिल्हयात प्रामुख्याने गोंड, परधान, माना, पारधी व कोलाम या प्रमुख आदिवासी जमाती आढळतात. राजुरा, कोरपना, जिवती व वरोरा या तालुक्यामध्ये प्रामुख्याने कोलाम जमातीचे वास्तव्य आपणास दिसुन येते.

चंद्रपूर जिल्हयात प्रामुख्याने जिवती, राजुरा, कोरपना आणि वरोरा तालुक्यामध्ये कोलाम जमात वास्तव्यास आहे. कोलाम जमाती ही इतर जमातीच्या दूर एक स्वतंत्र पाडा/गुडा/वस्त्यांमध्ये राहतात. कोलामांच्या पाडा/गुडा/वस्त्या हया गावापासून १ ते २ कि.मी. अंतरावर असतात. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण ६४ गुडे असुन जवळपास १०,००० च्या आसपास कोलाम जमातीची लोकसंख्या आहे.

केंद्र शासनाकडून आदिम जमाती म्हणून महाराष्ट्रात कोलाम, कातकरी व माडीया गोंड या ०३ जमातीचा समावेश केलेला आहे. त्यामुळे केंद्रपुरस्कृत आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम ही एक आदिम जमातीकरीता विशीष्ट योजना असून या योजनेचा हेतु हा आदिम जमातीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे.

**आदिवासी विकास विभागाअंतर्गत राबविण्यात येणारी "आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजना":-**

शासन आदिवासींचा सामाजिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी सतत कार्यरत आहेत व आदिवासींसाठी प्रामुख्याने क्षेत्रीय विकास, सामुहिक विकास व वैयक्तीक लाभाच्या योजना राबवित आहे. आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने १९९२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशीक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशीक, ठाणे, अमरावती व नागपूर तसेच ३० प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कार्यरत असून त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणून घोषीत करण्यात आली आहे. केंद्रशासनाने

आदिम जमाती म्हणून महाराष्ट्रात कोलाम, कातकरी व माडिया गोंड या तीन आदिवासी जमाती अधिसुचित केलेल्या आहेत. कोलाम जमात मुख्यत्वे यवतमाळ व चंद्रपूर जिल्हयात, कातकरी जमात रायगड व ठाणे जिल्हयात तर माडीया जमात गडचिरोली जिल्हयात प्रामुख्याने आढळतात.

केंद्रपुरस्कृत योजनेमध्ये १) विशेष केंद्रीय सहाय्य योजना, २) भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) योजना आणि ३) आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजना या तीन केंद्रीय योजना असुन या योजनेकरिता थेट केंद्रसरकार कडून निधी प्राप्त होत असतो. आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम ही योजना केंद्रशासनाने अधिसुचित केलेल्या आदिम जमातीकरिता राबविण्यात येतात. या योजनेचा मुख्य उद्देश आदिम जमातींना मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. महाराष्ट्रामध्ये कोलाम, कातकरी आणि माडीया गोंड या आदिम जमाती असल्याने या तीन जमाती करीता आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम ही योजना लागु आहे. या योजनेअंतर्गत आदिम जमाती वास्तव्य करित असलेल्या गुडा, पाडा किंवा वस्त्यांचा विकास करणे, आदिम जमातीला व्यवसायाभिमुक बनविणे, आदिम शेतकऱ्यांच्या शेतीचा विकास करून उत्पन्नात वाढ घडवून आणणे तसेच आदिम बचत गटांची स्थापना करून त्यांचा व्यवसायाभिमुक करणे अशा विविध क्षेत्रासाठी आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम ही योजना कार्य करित असते.

**चंद्रपूर जिल्हयातील आदिम जमातीकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर या कार्यालयामार्फत “आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजना” अंतर्गत सन २००८-०९ ते २०१८-१९ या कालावधीमधील राबविण्यात येणाऱ्या योजना पुढीलप्रमाणे:-**

**(रू. लाखात)**

| अ. क्र | वर्ष | योजनेचे नाव | प्राप्त निधी | खर्च निधी | शिल्लक निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | Nursary & kindergarden to pvtg children | १.०० | १.०० | ०.०० | |
| २ | २०१८-१९ | Residencial programe police & arm forces training | ३.०० | ३.०० | ०.०० | |
| ३ | २०१८-१९ | Training & tool kit supply to pvtg for honey collection | २.०० | २.०० | ०.०० | |
| ४ | २०१८-१९ | Formation to woman pvtg SHG | १५.०० | १५.०० | ०.०० | |
| ५ | २०१८-१९ | Implementation of drinking water supply | ६४.०० | ६३.३० | ०.७० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | scheme | | | | |
| ६ | २०१७-१८ | Training programme for agriculture and animal husbandary for PVTGs | १८.७५ | १८.७५ | ०.०० | |
| ७ | २०१७-१८ | Implementation of drinking water supply scheme | ४२.०० | ४२.०० | ०.०० | |
| ८ | २०१७-१८ | Individual irrigation wells for farmers and providing pumps pipes etc for 50 beneficiaries from kolam | ११२.५० | ८०.५० | ३२.०० | |
| ९ | २०१६-१७ | Mobile vegetable van & temprary shelter | ११.०६ | ११.०६ | ०.०० | |
| १० | २०१४-१५ | Monitoring Evaluation | २.३६ | १.०५ | १.३१ | |
| ११ | २०१४-१५ | Arogya- Mitra prashikshan | १२.३६ | ०.०० | ०.०० | आदिवासी विकास नागपूर यांना निधी वर्ग |
| १२ | २०१४-१५ | Puraka ahar | १६.०० | ०.०० | ०.०० | आदिवासी विकास नागपूर यांना निधी वर्ग |
| १३ | २०१४-१५ | Arogya, Poshan , Surakshit matrutva , Sudrudh balak - Madia , kolam, katkari woman SHG training | ७०.०० | ०.०० | ०.०० | आदिवासी विकास नागपूर यांना निधी वर्ग |
| १४ | २०१३-१४ | आदिम जमातीच्या ८ वी १० वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवुन ठेवण्यासाठी आर्थिक सहाय्य | ९.५४ | ९.५४ | ०.०० | |
| १५ | २०१३-१४ | Utpanna vadhichya yojana | २३०.३२ | ०.०० | ०.०० | आदिवासी विकास नागपूर यांना निधी वर्ग |
| १६ | २०१३-१४ | Arogya | ७.५० | ०.०० | ०.०० | प्रकल्प अधिकारी, भामरागड जि. गडचिरोली यांना निधी वर्ग |
| १७ | २०१०-११ | उपसा सिंचन | १०.०० | १०.०० | ०.०० | |
| १८ | २०१०-११ | प्रशिक्षित उमेदवारांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य | १० | १०.०० | ०.०० | |
| १९ | २०१०-११ | कौशल्य विकास प्रशिक्षण | १०.०० | १०.०० | ०.०० | |
| २० | २०१०-११ | नविन विहीर खोदने | १२.०० | १२.०० | ०.०० | |
| २१ | २०१०-११ | बेरोजगाराला आधुनिक संगणक प्रशिक्षण | १६.०० | १६.०० | ०.०० | |
| २२ | २०१०-११ | सांस्कृतिक कार्यक्रम/प्रदर्शनासाठी सहाय्य | ०.५० | ०.५० | ०.०० | |
| २३ | २००९-१० | औषधी वनस्पतीची लागवड व फलोद्यान | ०.१० | ०.१० | ०.०० | |
| २४ | २००९-१० | जनावरांचा कृत्रिम रेतन कॅम्प आयोजन लसीकरण आरोग्य तपासणी | ०.२० | ०.२० | ०.०० | |
| २५ | २००९-१० | ठिंबक तुषार सिंचन | ०.४० | ०.४० | ०.०० | |
| २६ | २००९-१० | मळणी यंत्राचा पुरवठा करणे | ०.४० | ०.४० | ०.०० | |
| २७ | २००९-१० | उपसा सिंचन | १.०० | १.०० | ०.०० | |
| २८ | २००९-१० | वराह पालनासाठी अर्थसहाय्य | १ | ०.०० | ०.०० | प्रकल्प अधिकारी, अहेरी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जि. गडचिरोली यांना निधी वर्ग |
| २९ | २००९-१० | नविन विहीर खोदने | १.५० | १.५० | ०.०० | |
| ३० | २००९-१० | उघडी विहीर बांधणे | १.६० | १.६० | ०.०० | |
| ३१ | २००९-१० | शेळी गट वाटप | ३.७५ | ३.७५ | ०.०० | |
| ३२ | २००९-१० | भुमिहिनांना जमिन | ६.०० | ६.०० | ०.०० | |
| ३३ | २००९-१० | वायुसौर हायब्रीड ऊर्जा प्रकल्पास १० टक्के अनुदान | १.७५ | १.७५ | ०.०० | |
| ३४ | २००९-१० | हातचलित बोअरवेल | १.२० | ०.४८ | ०.७२ | |
| ३५ | २००९-१० | दुधाळ जनावरांकरिता गोठा शेड | २.७० | १.०८ | १.६२ | |
| ३६ | २००९-१० | हॅन्डीक्राफ्ट युनिट स्थापना | ०.८० | ०.८० | ०.०० | |
| ३७ | २००८-०९ | औषधी वनस्पतीची लागवड व फलोद्यान | ०.१० | ०.१० | ०.०० | |
| ३८ | २००८-०९ | जनावरांचा कृत्रिम रेतन कॅम्प आयोजन लसीकरण आरोग्य तपासणी | ०.२० | ०.२० | ०.०० | |
| ३९ | २००८-०९ | ठिंबक तुषार सिंचन | ०.४० | ०.४० | ०.०० | |
| ४० | २००८-०९ | मळणी यंत्राचा पुरवठा करणे | ०.४० | ०.४० | ०.०० | |
| ४१ | २००८-०९ | उपसा सिंचन | १.०० | १.०० | ०.०० | |
| ४२ | २००८-०९ | वराह पालनासाठी अर्थसहाय्य | १.०० | ०.०० | ०.०० | प्रकल्प अधिकारी, अहेरी जि. गडचिरोली यांना निधी वर्ग |
| ४३ | २००८-०९ | नविन विहीर खोदने | १.५० | १.५० | ०.०० | |
| ४४ | २००८-०९ | उघडी विहीर बांधणे | १.६० | १.६० | ०.०० | |
| ४५ | २००८-०९ | शेळी गट वाटप | ३.७५ | ३.७५ | ०.०० | |
| ४६ | २००८-०९ | भुमिहिनांना जमिन | ६.०० | ६.०० | ०.०० | |
| ४७ | २००८-०९ | वायुसौर हायब्रीड ऊर्जा प्रकल्पास १० टक्के अनुदान | १.७५ | १.७५ | ०.०० | |
| ४८ | २००८-०९ | हातचलित बोअरवेल | १.२० | १.२० | ०.०० | |
| ४९ | २००८-०९ | दुधाळ जनावरांकरिता गोठा शेड | २.७० | १.०८ | १.६२ | |
| ५० | २००८-०९ | हॅन्डीक्राफ्ट युनिट स्थापना | ०.८० | ०.८० | ०.०० | |
| | | एकुण | ७२०.६९ | ३३८.५४ | ४३.९७ | रू. ३३८.१८ लक्ष निधी इतर कार्यालयास वर्ग करण्यात आलेली आहे. |

उपरोक्त योजनांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, कोलाम आदिम जमातीच्या विकासासाठी रू. ७२०.६९ लक्ष निधी शासनाकडून प्राप्त झालेला आहे त्यापैकी रू. ३३८.५४ लक्ष (४६.९८%) निधी खर्च झालेला आहे व रू. ३३८.१८ लक्ष (४६.९२%) निधी हा योजना न राबविल्यामुळे इरतत्र वर्ग करण्यात आलेला आहे व रू. ४३.९२ लक्ष (६.१०%) टक्के निधी हा अखर्चीत आहे. शासन एकीकडे आदिम जमातीचा विकास व्हावा म्हणून अनेक योजना प्रस्तावित करतात परंतु प्रत्यक्षामध्ये योजनांची अंमलबजावणी न झाल्यामुळे चंद्रपूर प्रकल्पातील सन

२०१४-१५ मधील Arogya- Mitra prashikshan, Puraka ahar, Arogya, Poshan , Surakshit matrutva , Sudrudh balak - Madia , kolam, katkari woman SHG trainingव सन २०१३.१४ मधीलUtpanna vadhichya yojana, Arogya, आणि सन २००८-०९ व २००९-१० मधील वराह पालनासाठी अर्थसहाय्य योजना अशा एकुण ०७ योजनेचा रू. ३३८.१८ लक्ष म्हणजेच एकुण निधीच्या ४६.९२ टक्के निधी एकही रूपया खर्च न करता इतरत्र वर्ग करण्यात आलेला आहे. शासन तसेच सरकार यांच्या आदिवासी जमाती संदर्भात असलेल्या निरूत्साहामुळे ज्या विकासाभिमुख योजना असतात त्यांची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे आदिम कोलाम जमात विकासापासून वंचित असल्याचे दिसुन येते.

**“आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजनेची”उद्दिष्टये:-**

१.आदिम कोलाम जमातीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

२.आदिमकोलाम जमातीचे स्थलांतर कमी करून त्यांच्या जीवनात स्थिरता निर्माण करणे.

३.आदिमकोलाम जमातीच्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

४.आदिमकोलाम बचत गटांकरिता उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे.

५.आदिमकोलाम विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

**आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम योजनेचा कोलाम जमातीवर झालेला परिणाम:-**

१. आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम या योजनेंतर्गत आदिम कोलाम जमाातीतील शेतकऱ्यांना सिंचनाचा स्त्रोत (सिंचन विहीर, एच.डी.पि.ई.पाईप, मोटर पंप तसेच तुषार व ठिबक सिंचन संच) संबंधित साहित्याची उपलब्धताझाल्याने आदिम कोलाम जमातीचे शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.

२. आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात मंजुर Mobilevegetable van & temprary shelterयोजनेअंतर्गत जुलै २०२२ मध्ये ०२ कोलाम बचत गटांना ०२ मिनी मालवाहु वाहनांचा पुरवठा करण्यात आल्यामुळे सदर बचत गटांना व्यवसायास प्रेरणा मिळून व्यवसाय करीत आहे व आपल्या उत्पन्ना वाढ करित आहे.

३. आदिम कोलाम जमातीतील शेतकरी तसेच बेरोजगार युवकांना विविध शेती तसेच इतर व्यवसायासंबंधीत प्रशिक्षणाचा लाभ झाल्यामुळे जीवनमान उंचविण्यास मदत होत आहे.

४. कोलाम पाडयामध्ये पिण्याच्या पाण्याची मोठया प्रमाणात असलेली समस्या सदर योजनेतुन दुरहोण्यास मदत झालेली आहे.

५. कोलाम जमातीतील बेरोजगार युवकांना अर्थसहाय्य तसेच काही व्यवसायाभिमुख साहित्याचा पुरवठा झाल्यामुळे बेरोजगार युवकांना रोजगार करण्यास संधी उपलब्ध झाालेली आहेत.

**निष्कर्ष:–**

उपरोक्त योजनांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, चंद्रपूर जिल्हयातील आदिम कोलाम जमाती करिता आदिवासी विकास विभागामार्फत मंजुर योजना चंद्रपूर जिल्हयात प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर व चिमुर या दोन कार्यालयामार्फत राबविण्यात येतात. चंद्रपूर जिल्हयामध्ये एकुण १५ तालुके असून कोरपना, जिवती, राजुरा, गोंडपिपरी, पोंभुर्णा, बल्लारपूर, चंद्रपूर, मुल, सिंदेवाही, सावली या दहा तालुक्यांचा समावेश प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूरहोतो तर भद्रावती, वरोरा, चिमुर, नागभिड आणि ब्रम्हपूरी या पाच तालुक्यांचा समावेश प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमुर या कार्यालयामध्ये होतो.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर या कार्यालयास भेट दिली असता असे दिसुन आले की, सन २००८–०९ पासुन ते सन २०१८–१९ या कालावधीमध्ये शैक्षणिक, कृषीविषयक, उत्पन्न वाढीच्या योजना तथा पायाभुत सोयीसुविधा संबंधित एकुण ५० योजनांचा समावेश आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम या योजनेत होत असुन त्याकरिता जी एकुण रक्कम प्राप्त झाली होती त्यापैकी फक्त ४६.९८ टक्के निधीच खर्च करण्यात आलेला आहेव व ४६.९२ टक्के निधी इतर वरिष्ठ कार्यालयास वर्ग करण्यात आल्याचे दिसुन येते.

कार्यालयातर्फे सन २००८–०९ ते २००९–१० तसेच इतर वर्षातील योजनांची अंमलबजावणी सन २०२१–२२ व आजतागायत चालु असल्याचे दिसुन येते. त्यामुळे ज्या वर्षात मंजुर योजनेची त्याच वर्षात अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही आणि योजनेचा ४६.९२ टक्के निधी एकही रूपया खर्च न करता इतर कार्यालयास वर्ग करण्यात आलेला आहे. ज्यामधुन आदिम कोलाम जमातीचा काही ना काही प्रमाणात विकास घडवुन आणता आला असता तसेच लाभार्थ्यांना विहीत कालावधीत योजनेचा लाभ मंजूर होत नाही व त्यामुळे आदिम जमातीचा विकास न झाल्याचे चित्र आपणास पहावयास मिळतात.

आदिम जमातीमधील समाविष्ठ जमाती हया आदिवासी समाजातील अतिशय मागासलेल्या जमाती असल्याने त्यांना विकासाच्या मुख्य प्रहावात आणणे हा या योजनेचा मुख्य उदद्देश आहे. त्यामुळे ज्या वर्षातील योजना त्याच वर्षात अंमलबजावणी झाल्यास त्याचा आदिम जमातीतील लोकांना विहीत कालावधीतच लाभ होईल व संबंधीत

योजनेचा निधी त्याच वर्षात खर्ची होईल आणि शासनास नविन योजना प्रस्तावित करता येईल.

**शिफारशी:–**

१. प्रत्येक योजनांचा योग्यप्रचार व प्रसार करून प्रसिध्दी करण्यात यावी.

२. कागदपत्रांच्या जाचक अटी मध्ये शिथिलता आण्यण्यात यावी. जेणेकरून शासन आणि लाभार्थी यांच्यामध्ये सुसंगतता निर्माण होऊन योजना अंमलबजावणी होण्यास मदत होईल.

३. कोलाम जमात ही अतिशय मागासलेली जमात असल्याने जिल्हयाच्या ठिकाणी येऊन योजनेचा लाभ घेणे त्यांना शक्य होत नाही त्याकरिता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाची रचना ही प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी करण्यात यावी परिणामत: आदिवासी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत ही योजना पोहोचविता येईल.

**संदर्भ :–**

डॉ. कोटनाके मधुकर (२०२१) – ‘कोलामगुडया’ची शिक्षणयात्रा – कैलास पब्लीकेशन, औरंगापूरा औरंगाबाद

डॉ. खडके सुधा मुरलीधर (२०१७) – कोलाम आदिवासी जीवन – प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

डॉ. खडके सुधा मुरलीधर (२०१८)– कोलाम सामाजिक संस्कृती मुल्य आणि आर्थिक विकास – प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

डॉ. देवगावकर एस. जी. (२०१६)– आदिवासी विकास आणि योजना – सनय प्रकाशन जुन्नर जि. पुणे

डॉ. देवगांवकर एस. जी., डॉ. देवगावकर शैलजा (२०११) – गोंड, परधान आणि कोलाम – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

मोडक रंगशाम संबाजी (२०२२) – आदिवासी कोलाम समाज –विश्वभारती हिंदी मराठी प्रकाशन, नागपूर

डॉ. आगलावे प्रदिप (२०११)– आदिवासी समाजाचे समाजशास्त्र–श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर . योजनांची माहितीपुस्तीका